महाराष्ट्र शासन

# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धाराशिव

डी.आय.सी.रोड, बार्शी नाका जवळ, धाराशिव

फोन क्र:-०२४७२-२२२६३३ E-mail :-dietosmanabad@maa.ac.in

जा क्र./जिशिवप्रसंधा/ शिक्षक स्पर्धा MS-PPT सु./२०२५-२०२६/ 1449 दि.३०/१०/२०२५

प्रति,

1. मा. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व),
2. शिक्षणाधिकारी प्राथमिक, जि. प. (सर्व),
3. शिक्षणाधिकारी माध्यमिक, जि. प. (सर्व),
4. प्रशासनाधिकारी, मनपा/ नपा, (सर्व)

**विषयः- शिक्षक, कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी MS-PPT सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करणेबाबत.**

**संदर्भः**
1. राष्ट्रीय शिक्षण धोरण-2020.
2. राज्य अभ्यासक्रम आराखडा 2024.
३.शासननिर्णय क्र. संकीर्ण 2024/प्र.क्र.10/एसडी-6 मंत्रालय, मुंबई दि. 15 मार्च 2024 (SQAAF)
4. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेकडील जा.क्र. राशैसंवप्रप/शिक्षक स्पर्धा/2025-26, दिनांक 10/10/2025 चे पत्र
5. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे दिनांक 14/10/2025 रोजीच्या Online बैठकीमधील सूचना.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय कौशल्य वृद्धिगत करणे, त्यांच्यात समन्वय, सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करणे तसेच त्यांच्या डिजिटल, भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देण्याच्या उद्देशाने तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर विविध स्पर्धाचे आयोजन शैक्षणिक वर्ष 2025-26 पासून करण्यात येत आहे.

या स्पर्धेच्या आयोजनासाठी निकष आणि नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर स्पर्धा या एकूण ४३ विषयांवर आधारित असणार आहेत. नमूद स्पर्धेचे निकष व नियमावली याबाबतची सविस्तर माहिती शिक्षक व अधिकारी/ कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका या पुस्तिकेत देण्यात आलेली आहे.

शिक्षक अधिकारी व कर्मचारी यांनी सदर पुस्तिकेत देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करावे. सदर पुस्तिका ही राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे या संस्थेच्या www.maa.ac.in या संकेतस्थळावर **उपयुक्त** या टॅबवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

वरील नियोजनानुसार सन 2025-26 वर्षापासून एकूण ४३ स्पर्धांचे आयोजन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व DIET कडून आयोजित करण्यात येणार आहे. याबाबत संबंधित DIET कडून मार्गदर्शक सूचना पत्र दिले जाणार आहे. त्यानुसार तालुकास्तरावर स्पर्धांचे आयोजन करावयाचे आहे.

वरील ४३ स्पर्धापैकी MS-PPT सादरीकरण स्पर्धेचे राज्यस्तरीय आयोजनाची जबाबदारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धाराशिव यांचेकडे देण्यात आलेली आहे, त्यानुसार MS-PPT सादरीकरण स्पर्धा आयोजनाबाबतच्या सूचना खालील प्रमाणे आहेत.

**MS-PPT सादरीकरण स्पर्धेविषयी-**

संदर्भ क्र.४ च्या पत्रानुसार नोव्हेंबर महिन्याच्या तिसरा शुक्रवार म्हणजेच २१ नोव्हेंबर २०२५ पर्यंत प्रत्येक तालुका स्तरावर स्पर्धा नियोजित आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

**MS-PPT सादरीकरण स्पर्धा एकूण तीन माध्यमात घेण्यात येईल. (मराठी, हिंदी, इंग्रजी )**

१. स्पर्धेकरिता नाव नोंदणीसाठी राज्यस्तरावरून केंद्रप्रमुख यांना लिंक देण्यात येईल.

२. केंद्रप्रमुख यांनी प्रत्येक केंद्रातून एका शिक्षकाचे नांव स्पर्धेसाठी लिंकवर नोंदवावे.

३. प्रत्येक स्पर्धेत केंद्रातील किमान एका शिक्षकाने सहभागी होणेसाठी प्रोत्साहित करण्यात यावे.

४. स्पर्धानिहाय सहभागी होणा-या कर्मचा-यांची/ शिक्षकांची लेखी संमती घ्यावी व स्पर्धेवेळी आयोजकांकडे सादर करावी.

५. केवळ केंद्रप्रमुख यांना लिंक पाठविली जाईल व केंद्रप्रमुख यांनी स्वतः शिक्षकांची क्षमता, कौशल्य पाहून नामनिर्देशन करावे.

६. दि.३१ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत केंद्रप्रमुख यांनी शिक्षकांची माहिती भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

७. या स्पर्धांची तयारी करण्यासाठी कोणत्याही प्रकारची सुट्टी घेत्ता येणार नाही तसेच शिक्षकांच्या सहभागामुळे अध्ययन अध्यापनाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

८. तालुकास्तरावरील स्पर्धाची जबाबदारी ही गटशिक्षणाधिकारी यांची राहील गटशिक्षणाधिकारी यांनी तालुकास्तरीय समितीच्या मदतीने तालुकास्तरीय स्पर्धा विहित वेळेत व निष्पक्षपातीपणे पार पाडाव्यात याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील.

९. तालुकास्तरीय स्पर्धेसाठी योग्य परीक्षकांची नावे अंतिम करून DIET कडे बायोडाटासह दिनांक ३१/१०/२०२५ पर्यंत पाठवावी, तसेच स्पर्धेचे ठिकाणही कळवावे.

प्रत्येक स्पर्धेसाठी तीन परीक्षकांची निवड करण्यात यावी. परीक्षकांसाठी SCERT, पुणे यांचेकडून निधी प्राप्त झाल्यास स्पर्धेच्या दिवसासाठी निर्धारीत मानधन देण्यात येईल. MS PPT सादरीकरण स्पर्धेसाठी ठिकाण निश्चित करून स्पर्धकांना आपला वयैक्तिक Laptop सोबत घेऊन येण्यास आदेशित करण्यात यावे.

**तालुकास्तरीय मूल्यांकन/आयोजन समिती-**

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | समितीतील पद |
|---|---|---|
| १ | गटशिक्षणाधिकारी | अध्यक्ष |
| २ | अधिव्याख्याता (DIET) तथा संपर्क अधिकारी | सदस्य |
| ३ | तंत्रस्नेही केंद्रप्रमुख -१ | सदस्य |
| ४ | तंत्रस्नेही शिक्षक-१ | सदस्य |
| ५ | विस्तार अधिकारी (शिक्षण) | सदस्य सचिव |

**विभागस्तरीय स्पर्धा मूल्यांकन/आयोजन समिती-**

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | समितीतील पद |
|---|---|---|
| १ | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, संबधित विभागीय DIET | पदसिद्ध अध्यक्ष |
| २ | MS-PPT सादरीकरण स्पर्धा प्रमुख DIET, संबधित विभागातील DIET -१ | सदस्य |
| ३ | MS-PPT सादरीकरण स्पर्धा प्रमुख DIET, संबधित विभागातील DIET -२ | सदस्य |
| ४ | MS-PPT सादरीकरण स्पर्धा प्रमुख DIET, संबधित विभागातील DIET -३ | सदस्य |
| ५ | तंत्रस्नेही शिक्षक, संबधित विभाग | सदस्य |
| ६ | तंत्रस्नेही शिक्षक, संबधित विभाग | सदस्य |
| ७ | स्पर्धा प्रमुख DIET, संबधित विभागीय DIET | सदस्य सचिव |

**राज्यस्तरीय स्पर्धा मूल्यांकन/आयोजन समिती- ( आयोजक जिल्हा धाराशिव )**

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | समितीतील पद |
|---|---|---|
| १ | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,धाराशिव | अध्यक्ष |
| २ | शिक्षणाधिकारी (प्राथमिक),धाराशिव | सदस्य |
| ३ | शिक्षणाधिकारी (माध्यमिक),धाराशिव | सदस्य |
| ४ | गटशिक्षणाधिकारी,धाराशिव | सदस्य |
| ५ | तंत्रस्नेही शिक्षक-१,धाराशिव | सदस्य |
| ६ | तंत्रस्नेही शिक्षक-१,धाराशिव | सदस्य |
| ७ | वरिष्ठ अधिव्याख्याता ,DIET ,धाराशिव | सदस्य सचिव |

वरील प्रमाणे समितीचे गठन करून बैठकीत स्पर्धेविषयी माहिती द्यावी. तालुकास्तरीय स्पर्धा गटशिक्षणाधिकारी यांनी तर विभागस्तर व राज्यस्तर स्पर्धांचे आयोजन संबंधित जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी SCERT, पुणे यांच्या मार्फत देण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचानाप्रमाणे करावे. आवश्यकतेनुसार वरिष्ठ कार्यालयाचे मार्गदर्शन घेण्यात यावे.

**<u>MS PPT सादरीकरण स्पर्धेचे नियोजन-</u>**

| अ.क्र. | वार व दिनांक | स्पर्धेचे नाव | आयोजक जिल्हा | नोव्हेंबर तालुकास्तर | डिसेंबर विभागस्तर | जानेवारी राज्यस्तर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | तिसरा शुक्रवार | MS-पॉवर पॉईट सादरीकरण स्पर्धा | धाराशिव | नोव्हेंबर अखेर पर्यंत कॉलम २ मधील दिवसापर्यंत पुर्ण करावयाचे कामकाज (प्रत्येक स्पर्धेतील १ विजेता निवडणे) | डिसेंबर अखेर पर्यंत कॉलम २ मधील दिवसापर्यंत पुर्ण करावयाचे कामकाज (प्रत्येक स्पर्धेतील ५ विजेता निवडणे) | जानेवारी अखेर पर्यंत कॉलम २ मधील दिवसापर्यंत पुर्ण करावयाचे कामकाज (प्रत्येक स्पर्धेतील १० विजेता निवडणे) |

**तालुका / विभाग स्तरीय स्पर्धेच्या आयोजनाबाबत –**

१. तालुका / विभाग स्तरीय स्पर्धांच्या आयोजनाची जबाबदारी संबंधित तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी / प्राचार्य संबंधित विभागीय DIET यांची राहील.

२. स्पर्धेच्या स्तराप्रमाणे नियोजनाकरीता जिल्ह्यातील व विभागातील विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, विषय साधन व्यक्ति यांना जबाबदारीचे वाटप करावे.

३. स्पर्धेकरिता स्थळ निश्चिती करून, सक्षम परीक्षकाची निवड करून विहित कालावधीत स्पर्धा पार पाडाव्यात व प्रत्येक स्पर्धेतील अंतिम विजेत्यांची नावांची यादी तयार करून तालुक्याने संबंधित DIET कडे व विभागाने DIET, धाराशिव यांचेकडे सोबत देण्यात आलेल्या E-mail वर पाठवावी.

४. तालुकास्तरीय व विभाग स्तरीय स्पर्धांच्या आयोजन समितीने संपूर्ण सनियंत्रण करावे. आयोजनात सहभागी सर्वांनी मार्गदर्शक पुस्तिका व त्यातील नियमावलीचे काळजीपूर्वक वाचन करावे.

५. परीक्षकांची नावे अंतिम करून, स्पर्धाचे स्थळ निश्चित करून परीक्षकांच्या बायोडाटासह ही माहिती दि.३०/१०/२०२५पर्यंत तालुक्याने संबंधित जिल्ह्याच्या DIET कार्यालयास व विभागाने DIET, धाराशिव यांना पाठवावी.

६.- तालुका व विभाग स्तरीय स्पर्धा संदर्भिय पत्रातील वेळापत्रकानुसार पार पाडाव्यात.

वरील नियोजनामध्ये काही कारणास्तव बदल झाल्यास SCERT / स्थानिक जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) यांचेमार्फत कळविण्यात येईल. त्यानुसार कार्यवाही विहित वेळेत करावी.

**विभागस्तरीय स्पर्धीतील अंतिम विजेत्यांची साक्षांकीत यादी पाठवण्याकरिता E-mail –**
**dietosmanabad@maa.ac.in**

**सर्धेचे ठिकाण –**

१. **तालुकास्तरीय** स्पर्धा – संबंधित गटशिक्षणाधिकारी यांचे मार्फत कळविण्यात येईल.
२. विभागस्तरीय स्पर्धा - संबंधित विभागस्तरीय **DIET** यांचे मार्फत कळविण्यात येईल.
३. राज्यस्तरीय स्पर्धा – जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धाराशिव.

**सोबत :-**

१. मा.संचालक, SCERT,पुणे यांचे संदर्भिय पत्र
२. MS-PPT सादरीकरण स्पर्धेची सुधारीत नियमावली, मुल्यांकन तक्ता व संकलित गुणनोंद तक्ता

(डॉ.दयानंद जटनुरे)
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
धाराशिव

**प्रत :-**

१. मा.संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर
२. मा. शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग महाराष्ट्र राज्य यांना माहितीस्तव सविनय सादर

# जिल्हा शिक्षण् व प्रशिक्षण संस्था, धाराशिव

## MS-PPT सादरीकरण स्पर्धा

**सुधारित**

**प्रस्तावना :**

राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP 2020) व राष्ट्रीय आणि राज्य अभ्यासक्रम आराखड्यांच्या (NCF/SCF) पार्श्वभूमीवर शिक्षणात तंत्रज्ञानाचा अधिकाधिक प्रभावी वापर आवश्यक ठरतो आहे. शिक्षक, अधिकारी, कर्मचारी यांनी कामात डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करून उपयुक्त, विदयार्थिकेंद्रित सादरीकरण कौशल्ये विकसित करावीत, यासाठी राज्यस्तरीय खुल्या पॉवरपॉइंट सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

**स्पर्धेचे उद्दिष्ट :**

शिक्षकांच्या सर्जनशील सादरीकरण कौशल्यांना व नवकल्पनांना प्रोत्साहन देणे, जेणेकरून अध्यापन अधिक प्रभावी, आकर्षक आणि विद्यार्थिकेंद्रित होईल.

**पात्रता निकष :**

- महाराष्ट्रातील सर्व शासकीय, निमशासकीय व खासगी मान्यताप्राप्त शाळांमधील इयत्ता पहिली ते बारावी चे शिक्षक (ज्यांचा सेवार्थ / शालार्थ आयडी उपलब्ध आहे) तसेच शालेय शिक्षण विभाग प्रशासन व सक्षमीकरण शाखेतील अधिकारी/कर्मचारी पात्र असतील.
- एक शिक्षक फक्त एकच सादरीकरण तयार करू शकेल.

**स्पर्धेची प्रक्रिया व वेळापत्रक :**

त्रिस्तरीय प्रक्रिया तालुका, विभाग आणि राज्य स्तर :

**तालुका स्तर :**

- प्रत्येक केंद्रातून एक शिक्षक नाव नोंदवेल.
- एकापेक्षा अधिक इच्छुक असल्यास केंद्रप्रमुख निवड करतील.

ठिकाण, दिनांक व वेळ निश्चित करून स्पर्धा घेण्यात येईल.

- शिक्षकाने स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित राहून सादरीकरण तयार करणे आवश्यक आहे.
- निवड समितीमार्फत मूल्यमापन करून तालुक्यातुन एक विजेता विभाग स्तरावर पाठवला जाईल.

**विभाग स्तर :**

तालुक्यातुन पाठवलेल्या स्पर्धकांची विभाग स्तरावर वेळापत्रकानुसार स्पर्धा होईल.

यामध्येही तालुकास्तरावरील स्पर्धेप्रमाणे सादरीकरण प्रक्रिया, मूल्यांकन होईल आणि विभाग स्तरावरून पाच विजेते राज्य स्तरावर पाठवले जातील.

**राज्य स्तर :**

विभागस्तरीय विजेत्या स्पर्धकांना राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आयोजक जिल्हयात वेळापत्रकानुसार पाठवले जाईल.

तालुकास्तर,विभागस्तर यांची  सादरीकरण प्रक्रिया, मूल्यांकन प्रक्रिया ही खालील नियमानुसार होईल.

राज्यस्तरावर मूल्यांकन  समिती 10 विजेत्यांची निवड करेल.

**महत्त्वाचे नियम :**

1.PPT मध्ये वापरलेला मजकूर व आशय आदर्श व दर्जेदार असावा.

2.प्रत्येक शिक्षकाने स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित राहून स्वतः सादरीकरण तयार करणे आवश्यक आहे.

3.सॉफ्ट कॉपी जमा करावी लागेल.

4.सादरीकरणामध्ये खालील माहिती असावी :
नाव, पदनाम, शाळेचे/कार्यालयाचे नाव, केंद्र, तालुका, जिल्हा, UDISE कोड, शालार्थ/सेवार्थ आयडी, मोबाइल क्रमांक.

5.सादरीकरणाची भाषा मराठी, इंग्रजी किंवा हिंदी.

6.सादरीकरणाचा कालावधी २० मिनिटे. (प्रत्यक्ष सादरीकरण केल्यासारखे.)

7.स्लाइड्स किमान १० व कमाल १५ (Title आणि Thank You स्लाईडसह).

8.सादरीकरण फाईल प्रकार PPT/PPTX/Google Slides.

9.स्लाईडवर व्हिडीओ किंवा ऑडिओ मजकूर असू नये.

10.सादरीकरणाचा विषय शालेय अध्ययन/अध्यापन विषयाशी संबंधित असावा.

11.निवड समिती सदस्य शिक्षकांना स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

12.Slide Ratio 16:9 असावा.

13.कोणतीही सामाजिक माध्यमे किंवा व्यावसायिक जाहिरात सादरीकरणात नसावी.

14.मजकूर व चित्रे कॉपीराईटमुक्त (Creative Commons) असावीत.

15.मराठी मजकुरासाठी Unicode font वापरावा; इंग्रजीसाठी Arial किंवा Times New Roman.

16.सर्व नियमानुसार कालमर्यादा आणि सादरीकरण मर्यादा पाळणे आवश्यक आहे.

17.नियमभंग, कॉपीराईट उल्लंघन किंवा गैरमार्गाचा वापर झाल्यास स्पर्धेतून बाद करण्यात येईल.

18.कोणत्याही स्तरावरील निवड समितीचा निर्णय अंतिम असेल. पुनरावृत्ती/हरकत ग्राहय धरली जाणार नाही.

19. सदर PPT सादरीकरण स्पर्धेकरिता AI tools चा वापर करता येणार नाही.

**मूल्यांकन निकष व रुब्रिक्स : (एकूण गुण १००)**

| अ.क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| १) | सामग्रीची गुणवत्ता (Content Quality) | २५ |
| २) | शैक्षणिक उपयुक्तता (Pedagogical Value) | २० |
| ३) | दृश्य रचना सौंदर्य (Visual Design and Aesthetics) | १५ |
| ४) | सर्जनशीलता व मौलिकता (Creativity and Originality) | १५ |
| ५) | तांत्रिक बाजू (Technical Execution) | १५ |
| ६) | सूचनांचे पालन (Adherence to Guidelines) | १० |

रूब्रिक तपशीलानुसार मूल्यांकन श्रेणी-

1) सामग्रीची गुणवत्ता- 25 गुण

| गुणांची श्रेणी | निकष |
|---|---|
| 21-25 | माहिती अत्यंत अचूक व सखोल, विषयाशी पूर्णत: सुसंगत. शैक्षणिक धोरणाशी (NEP,NCF,SCF) सुसंगत |
| 16-20 | माहिती अचूक व विषयाशी सुसंगत, सखोलता थोडी कमी |
| 11-15 | काही मुद्दे सामान्य किंवा अस्पष्ट, थोडे विषयांतर |
| 0-10 | माहिती अपूर्ण/चूकीची, विषयाच्या मुख्य विषयांपासून दूर |

2) शैक्षणिक उपयुक्तता- 20 गुण

| गुणांची श्रेणी | निकष |
|---|---|
| 17-20 | शिकण्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त, नावीन्यपूर्ण दृष्टीकोन व पद्धती, स्पष्ट उदिष्टे |
| 13-16 | उपयुक्तता चांगली, काही प्रमाणात नवकल्पना |
| 9-12 | काही प्रमाणात उपयुक्त, उदिष्ट थोडी अस्पष्ट |
| 0-8 | शैक्षणिक वापर स्पष्ट नाही. उदिष्टांचा अभाव |

3) दृश्य रचना सौंदर्य - 15 गुण

| गुणांची श्रेणी | निकष |
|---|---|
| 13-15 | अत्यंत आकर्षक व संतुलित मांडणी, उत्कृष्ट फॉन्ट, रंग व ग्राफिक्स |
| 10-12 | चांगली मांडणी, काही सुधारणा शक्य |
| 6-9 | सामान्य रचना, थोडी असमाधानकारक मांडणी |
| 0-5 | गोंधळलेली, असंमजस रचना, वाचन कठीण |

4) सर्जनशीलता व मौलिकता- 15 गुण

| गुणांची श्रेणी | निकष |
|---|---|
| 12-15 | अत्यंत सर्जनशील, पूर्णत: वेगळी व नावीन्यपूर्ण सादरीकरण पद्धत |
| 9-11 | काही प्रमाणात मौलिकता व कल्पकता |
| 5-8 | सामान्य सादरीकरण, पूर्वानुभववावर आधारीत |
| 0-4 | साचेबद्ध, कल्पकतेचा अभाव |

5) तांत्रिक बाजू- 15 गुण

| गुणांची श्रेणी | निकष |
|---|---|
| 12-15 | सर्व तांत्रिक घटक कार्यरत, स्लाइडस सहज व व्यवस्थित |
| 8-11 | लहान तांत्रिक अडचण, सादरीकरणावर परिणाम नाही |
| 5-7 | स्पष्ट तांत्रिक त्रुट, अनुभवात व्यत्यय |
| 0-4 | गंभीर तांत्रिक त्रुटी, सादरीकरणास अडथळा |

6) सूचनांचे पालन- 10 गुण

| गुणांची श्रेणी | निकष |
|---|---|
| 9-10 | सर्व सूचनांचे अचूक पालन, स्वरूप व वेळेचे अचूक पालन |
| 7-8 | बहुतांश सूचनांचे पालन |
| 4-6 | काही महत्वाच्या सूचनांचे पालन नाही |
| 0-3 | बहुतेक सूचनांचे उल्लंघन, स्वरूप व वेळ चुकीचे |

# MS-PowerPoint सादरीकरण स्पर्धा
## मूल्यांकन तक्ता (Rubrics)

स्पर्धकाचे संपुर्ण नाव- ------------------------------------------------- संपर्क क्रमांक- ---------------

शाळा/कार्यालयाचे नाव------------------------------------- ईमेल आयडी----------------------------

**एकूण गुण: 100**

| अ.क्र. | निकष | गुण | गुणांची श्रेणी | मूल्यांकन निकष | प्राप्त गुण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सामग्रीची गुणवत्ता (Content Quality) | 25 | 21–25 | माहिती अत्यंत अचूक व सखोल, विषयाशी पूर्णत: सुसंगत. शैक्षणिक धोरण (NEP, NCF, SCF) शी सुसंगत | |
| | | | 16–20 | माहिती अचूक व विषयाशी सुसंगत, सखोलता थोडी कमी | |
| | | | 11–15 | काही मुद्दे सामान्य किंवा अस्पष्ट, थोडे विषयांतर | |
| | | | 0–10 | माहिती अपूर्ण/चूकीची, मुख्य विषयापासून दूर | |
| 2 | शैक्षणिक उपयुक्तता (Pedagogical Value) | 20 | 17–20 | शिकण्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त, नावीन्यपूर्ण पद्धती, स्पष्ट उद्दिष्टे | |
| | | | 13–16 | उपयुक्तता चांगली, काही प्रमाणात नवकल्पना | |
| | | | 9–12 | काही प्रमाणात उपयुक्त, उद्दिष्ट थोडे अस्पष्ट | |
| | | | 0–8 | शैक्षणिक वापर स्पष्ट नाही, उद्दिष्टांचा अभाव | |
| 3 | दृश्य रचना व सौंदर्य (Visual Design & Aesthetics) | 15 | 13–15 | अत्यंत आकर्षक, संतुलित मांडणी, उत्कृष्ट फॉन्ट, रंग व ग्राफिक्स | |
| | | | 10–12 | चांगली मांडणी, काही सुधारणा शक्य | |
| | | | 6–9 | सामान्य रचना, थोडी असमाधानकारक मांडणी | |
| | | | 0–5 | गोंधळलेली, असंमजस रचना, वाचन कठीण | |
| 4 | सर्जनशीलता व मौलिकता (Creativity & Originality) | 15 | 12–15 | अत्यंत सर्जनशील, पूर्णत: नावीन्यपूर्ण सादरीकरण | |
| | | | 9–11 | काही प्रमाणात मौलिकता व कल्पकता | |
| | | | 5–8 | सामान्य सादरीकरण, पूर्वानुभवावर आधारित | |
| | | | 0–4 | साचेबद्ध, कल्पकतेचा अभाव | |
| 5 | तांत्रिक बाजू (Technical Execution) | 15 | 12–15 | सर्व तांत्रिक घटक कार्यरत, स्लाइड्स सहज व व्यवस्थित | |
| | | | 8–11 | लहान तांत्रिक अडचणी, परिणाम नगण्य | |
| | | | 5–7 | स्पष्ट तांत्रिक त्रुटी, अनुभवात व्यत्यय | |
| | | | 0–4 | गंभीर तांत्रिक त्रुटी, सादरीकरणास अडथळा | |
| 6 | सूचनांचे पालन (Adherence to Guidelines) | 10 | 9–10 | सर्व सूचनांचे व वेळेचे अचूक पालन | |
| | | | 7–8 | बहुतांश सूचनांचे पालन | |
| | | | 4–6 | काही महत्वाच्या सूचनांचे पालन नाही | |
| | | | 0–3 | बहुतेक सूचनांचे उल्लंघन, स्वरूप/वेळ चुकीचे | |
| | | | | एकूण गुण (100 पैकी ) | |

परीक्षक क्र.01 नाव व स्वाक्षरी

परीक्षक क्र.02 नाव व स्वाक्षरी

परीक्षक क्र.03 नाव व स्वाक्षरी

# MS-PPT सादरीकरण स्पर्धा
## तालुका/विभाग/राज्यस्तर संकलित गुण नोंदणी तक्ता

| अ.क्र. | तालुका/ जिल्हा/ विभाग | स्पर्धकाचे नाव | शाळा/कार्यालय | मोबाईल क्र. | मूल्यांकन निकष | | | | | | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सामग्रीची गुणवत्ता | शैक्षणिक उपयुक्तता | दृश्य रचना सौंदर्य | सर्जनशीलता व मौलिकता | तांत्रिक बाजू | सूचनांचे पालन | |
| | | | | | गुण 25 | गुण 20 | गुण 15 | गुण 15 | गुण 15 | गुण 10 | 100 |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

(सदर स्पर्धेच्या मूल्यांकनासाठी रूब्रिक तपशीलानुसार मूल्यांकन श्रेणी तक्त्याचा वापर करण्यात यावा. )

समिती सदस्य-1 समिती सदस्य-2 समिती सदस्य-3 समिती सदस्य-4 समिती सदस्य-5